# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोल दिनांक ३१/१०/२०१८

**'राष्ट्रीय एकता दिना निमित्ताने एकता दौड व पथसंचलन'**

सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्मदिवस आज सर्वत्र 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणुन साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने आज गडचिरोली पोलीस दलातर्फे मा. पोलीस अधिक्षक, श्री शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या मार्गदर्शनाखाली 'एकता दौड' चे आयोजन करण्यात आले होते. सदर दौडचा मार्ग पोलीस स्टेशन गडचिरोली ते बँक ऑफ इंडिया गडचिरोली व तेथुन परत बँक ऑफ इंडिया ते गडचिरोली पोलीस स्टेशन असा ठरविण्यात येवुन जास्तीत जास्त संख्येने यात सहभागी होण्यासाठी गडचिरोली पोलीस दलातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात आलेले होते.

सकाळी ०७:०० वा. मा. अपर पोलीस अधिक्षक, डॉ. हरी बालाजी यांनी दौड मध्ये सहभागी पोलीस अधिकारी,कर्मचारी तसेच विद्यार्थ्यी यांना हिरवा झेंडा दाखवुन एकता दौडचा प्रारंभ करण्यात आला. यानंतर ०७:३० वा. मा. अपर पोलीस अधिक्षक, डॉ. हरी बालाजी यांनी उपस्थित सर्वांना राष्ट्रीय एकतेची शपथ दिली.

यानंतर सायंकाळी ०४:०० वा. मा. पोलीस अधिक्षक, श्री शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या उपस्थितीत मुख्य चौकातुन गडचिरोली शहरातील धानोरा, चंद्रपुर, आरमोरी, व चामोर्शी कडे जाणा-या मार्गावर पथसंचलन करण्यात आले. यावेळी मोठ्या प्रमाणावर पोलीस अधिकारी व कर्मचरी उपस्थित होते.



